**क्र.१४४२(२)/मविप/२०१७/१३-ब** **दिनांक: ३१ डिसेंबर, २०२०**

## घोषणा

**पोलीस उपनिरीक्षक मर्यादित विभागीय स्पर्धा (मुख्य) परीक्षा-२०१७ (जाहिरात क्र. ७३/२०१७)**
**कोव्हीड-१९ ची आरटीपीसीआर (RT-PCR) टेस्ट Positive आलेल्या उमेदवारांच्या नाशिक जिल्हाकेंद्रावरील शारीरिक चाचणीबाबत**

पोलीस उपनिरीक्षक मर्यादित विभागीय स्पर्धा (मुख्य) परीक्षा-२०१७ या परीक्षेचा शारीरिक चाचणीचा सुधारित कार्यक्रम **दिनांक ३, ४, ५, ७ व ८ डिसेंबर, २०२०** या कालावधीत **राज्य राखीव पोलीस बल, गट क्र. ९, वडाळी नाक्याजवळ, चांदूर रेल्वे मार्ग, अमरावती** येथे घेण्यात आला होता. सदर शारिरीक चाचणीचा कार्यक्रम वैद्यकीय कारणास्तव मुदतवाढ देण्यात आलेल्या उमेदवारांसह अंतिम असल्यामुळे यापुढे शारीरिक चाचणीसाठी कोणत्याही कारणास्तव मुदतवाढ मिळणार नाही, असे उपरोक्त कालावधीत चाचणीमध्ये कोव्हीड-१९ पॉझिटिव्ह असलेल्या उमेदवारांसह इतर सर्व उमेदवारांना कळविण्यात आले होते. तथापि प्रस्तुत कालावधीत शारीरिक चाचणी आयोजित करण्यात आलेल्या काही उमेदवारांची कोव्हीड-१९ ची आरटीपीसीआर(RT-PCR) टेस्ट पॉझिटिव्ह असल्याचे आढळून आल्यामुळे संबंधित उमेदवार शारीरिक तपासणी करिता उपस्थित राहू शकले नाहीत. अशा उमेदवारांनी शारीरिक चाचणीच्या मुदतवाढीसाठी आयोगाकडे त्यावेळी निवेदन सादर केली होती. कोव्हीड-१९ विषाणुच्या प्रादुर्भावाच्या पार्श्वभूमीवर व पोलिस दलातील पोलिस कर्मचाऱ्यांचा देशातील प्रथम योद्ध्याच्या भूमिकेचा तसेच जागतिक स्तरावर कोव्हीड-१९ विषाणूमुळे उद्भवलेल्या असामान्य बिकट परिस्थितीचा साकल्याने विचार करून सदर कारणास्तव आयोगास करण्यात आलेली विनंती मान्य करण्याचा आयोगाने निर्णय घेतला आहे. त्यानुसार दिनांक ३ ते ८ डिसेंबर २०२० च्या कार्यक्रमासाठी शारीरिक चाचणीसाठी बोलाविण्यात आलेल्या तथापि या कालावधीत कोविड-१९ पॉझिटिव्ह अहवाल असलेले व ज्यांनी या कालावधीत आयोगाकडे तसे कळविले होते अशा उमेदवारांचा शारीरिक चाचणीचा कार्यक्रम **पोलीस मुख्यालय,सीबीएस जवळ,नाशिक,** या जिल्हाकेंद्रावर दिनांक १५ जानेवारी, २०२१ रोजी आयोजित करण्यात आला आहे.

२. नोवेल कोरोना विषाणू (**Covid १९**) च्या प्रादुर्भावाच्या अनुषंगाने शारीरिक चाचणीस येताना उमेदवारांनी खालील सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे:-

(१) उमेदवारांनी शासनमान्य कोव्हिड प्रयोगशाळेतून आरटीपीसीआर (RT-PCR) चाचणी करावी. सदर चाचणीचा रिपोर्ट निगेटिव्ह असेल तरच उमेदवारास शारीरिक चाचणीसाठी प्रवेश देण्यात येईल. शारीरिक चाचणीच्या दिनांकापूर्वी ७२ तास (२ ते ३ दिवस) आधीचा टेस्ट रिपोर्ट ग्राह्य धरण्यात येणार नाही. तसेच उमेदवारांनी COVID अँटीबॉडी ब्लड टेस्ट अहवाल सादर करणेही आवश्यक राहील.

(२) शारीरिक चाचणीला येताना सर्व उमेदवारांनी किमान ३ पदरी कापडाच्या मास्कचा वापर करणे अनिवार्य आहे. शारीरिक चाचणीच्या दरम्यान उमेदवारांनी एन-९५ मास्क वापरु नयेत. त्याऐवजी २ प्लाय/३ प्लाय (Breathebal) मास्कचा वापर केला जाऊ शकेल.

(३) वैयक्तिक स्वच्छतेचे पालन काटेकोरपणे करणे आवश्यक आहे.

(४) उमेदवारांकडे स्वतःचा सॅनिटाईझर (Sanitizer) असावा व त्याचा वेळोवेळी वापर करावा.

(५) उमेदवारांनी Social Distancing चे योग्य प्रकारे पालन करावे.

(६) शारीरिक चाचणीला येताना उमेदवाराने शक्यतो एकटे यावे, शारीरिक चाचणीच्या ठिकाणी नातलगांची गर्दी होवू नये.

(७) जंतू संसर्ग टाळण्यासाठी हात न धुता नाक, तोंड व डोळे यांना स्पर्श करणे टाळावे.

(८) उमेदवार टिश्यू पेपर वापरत असल्यास वापर केल्यावर तो तात्काळ बंद कचरापेटीत फेकून द्यावा.

(९) कोव्हिड- १९ चा प्रादूर्भाव वाढू नये यासाठी शासनाने दिलेल्या सर्व मार्गदर्शक सूचनाचे काटेकोरपणे पालन करावे.

३. प्रस्तुत शारीरिक चाचणीचा कार्यक्रम हा फक्त अमरावती केंद्रावरील शारीरिक चाचणीच्या कालावधीत आरटीपीसीआर (RT-PCR) टेस्ट Positive आलेल्या उमेदवारांसाठीच असल्याने यापुढे कोणत्याही परिस्थितीत कोणत्याही कारणास्तव उमेदवारांना मुदतवाढ मिळणार नाही. तसेच सदरचा निर्णय कोविड-१९ च्या प्रादुर्भावाच्या पार्श्वभूमीवर असामान्य परिस्थितीत घेण्यात येत असल्यामुळे तो पुर्वोदाहरण समजण्यात येणार नाही.

४. प्रस्तुत शारीरिक चाचणीसाठी पात्र उमेदवारांना त्यांच्या Profile मधील Latest Notificationया सदरामध्ये शारीरिक चाचणीचे पत्र स्वतंत्रपणे उपलब्ध करुन देण्यात येत आहे, तसेच, आयोगाकडील नोंदणीकृत मोबाईल दूरध्वनीक्रमांकावर लघुसंदेश (एसएमएस) पाठविण्यात येत आहे.

**ठिकाण- मुंबई**

**उपसचिव, परीक्षा-२**
**महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई**